
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २७ ऑगस्ट २०२५

आतील पानावर

पान २ – या अभिनेत्रीने लॉन्च केला पाण्याचा ब्रँड
पान ३ – मी बिपाशापेक्षा उत्तम
पान ४ – 'कांतारा: चॅप्टर १'मध्ये 'या' अभिनेत्रीची ...
पान ५– मी साकारलेली 'गंगी' भावली नसती...
पान ६ – थंडबस्त्यात गेला अनुष्काचा...

# रामायणात अमिताभ यांची दुहेरी भूमिका?

प्रसिद्ध दिग्दर्शक नितेश तिवारी यांचा आगामी आणि बहुचर्चित 'रामायण' चित्रपट सतत चर्चेत आहे. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान रामाची आणि साई पल्लवी सीतेची भूमिका साकारत आहे. आता या चित्रपटाशी संबंधित एक मोठी बातमी समोर आली आहे, ज्यात महानायक अमिताभ बच्चन यांच्या दुहेरी भूमिकेची चर्चा आहे. त्यामुळे अमिताभ बच्चन यांचे चाहते आणि 'रामायण' सिनेमाची वाट पाहणाऱ्यांना प्रेक्षकांना मोठं सरप्राईज मिळणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अमिताभ बच्चन 'रामायण' मध्ये जटायूच्या भूमिकेला आवाज देणार आहेत. जटायूचे पात्र व्हीएफएक्सच्या मदतीने तयार केले जाईल आणि त्याला अमिताभ बच्चन यांचा दमदार आवाज दिला जाईल. यासाठी अमिताभ यांच्या डोळ्यांचे स्कॅनिंगही करण्यात आल्याचे सांगितले जाते, जेणेकरून या पौराणिक पात्राला अधिक प्रभावी बनवता येईल. यासोबतच, निर्मात्यांनी अमिताभ बच्चन यांना आणखी एका महत्त्वाच्या भूमिकेसाठी संपर्क साधला आहे. रिपोर्ट्सनुसार, ते 'रामायण' चित्रपटाचे सूत्रधार (निवेदक) म्हणूनही दिसू शकतात. त्यांची दमदार आवाजातील निवेदन शैली चित्रपटाच्या सुरुवातीलाच प्रेक्षकांना रामायणाच्या अद्भुत जगात घेऊन जाईल, अशी निर्मात्यांना आशा आहे. याबाबत अजूनही निश्चितता नसली तरीही अमिताभ यांना जटायू आणि निवेदक या दुहेरी भूमिकेत पाहण्यात चाहते नक्कीच उत्सुक असतील, यात शंका नाही. अमिताभ बच्चन यांनी यापूर्वीही 'ब्रह्मास्त्र' सारख्या चित्रपटांमध्ये अभिनयासोबतच निवेदकाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे, 'रामायण' मध्येही त्यांची दुहेरी भूमिका चित्रपटाची भव्यता नक्कीच वाढवेल. या चित्रपटात रणबीर आणि साई पल्लवी यांच्यासोबत यश रावणाची, सनी देओल हनुमानाची, तर लारा दत्ता कैकेयीची भूमिका साकारणार आहेत. 'रामायण' हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार असून, पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.







# ऐश्वर्य ठाकरेचे 'निशांची'तील पहिलं गाणं प्रदर्शित

मराठीसह 'निशांची' सिनेमातील पहिले गाणे 'डिअर कंट्री' प्रदर्शित झाले आहे. हे गाणे प्रसिद्ध संगीतकार ध्रुव घाणेकर यांनी संगीतबद्ध केले असून त्याला भावपूर्ण आवाज दिला आहे विजय लाल यादव यांनी आणि शब्द लिहिले आहेत प्यारेलाल देवनाथ यादव यांनी. डिअर कंट्री हे गाणे उत्तर भारतीय लोकसंगीताचा प्रभाव, खेळकर इंग्रजी ओळी, तबल्याच्या ठेक्यांसह हार्मोनियमच्या सूरांनी सजलेले आहे. नाचायला लावणाऱ्या ठेक्यांसह हे गाणं आपल्या मनात घर करतं आणि चित्रपटाच्या 'देसी मसाला' भावना उत्तमपणे उलगडते. 'डिअर कंट्री' या गाण्याचे व्हिडिओ देखील तितकेच रंगीत आणि जोशपूर्ण आहे. चित्रपटातील काही निवडक दृश्यांतून तयार केलेली एक वेगवान मोंटाज, ज्यामध्ये उच्च-भावनात्मक प्रसंग आणि मुलांचं त्यांच्या आईसाठीचं प्रेम दिसून येतं. 'डिअर कंट्री' हे एक संगीतमय, हृदयस्पर्शी आणि खेडूत रंगांनी नटलेलं मातृभूमीला वाहिलेलं प्रेमपत्र आहे. संगीतकार ध्रुव घाणेकर यांनी सांगितले, हे गाणं ऐकताक्षणी प्रेक्षकांना खेड्यांचं वातावरण जाणवावं, ही कल्पना होती. पारंपरिक सूरांपासून सुरुवात करून, त्यात देसी इंग्रजी मिसळली. जशी लहान गावांमधली लोकं बोलतात, अगदी मनातून. मला चित्रपटाच्या वेडसर आणि प्रेमळ कथानकाला जुळणं गरजेचं वाटलं. अनुराग कश्यप यांच्या चित्रपटांना खास साउंडट्रॅक असतोच, त्यामुळे मला काहीतरी वेगळं करायचं होतं आणि डिअर कंट्री तसंच झालं मजेशीर, आगळंवेगळं, मुळांशी जोडलेलं. निशांची हा चित्रपट अनुराग कश्यप यांनी दिग्दर्शित केला असून, अजय राय आणि रंजन सिंग यांनी जार पिक्चर्स अंतर्गत आणि फ्लिप फिल्म्स सहनिर्मित केला आहे. कथा प्रसून मिश्रा, रंजन चंदेल आणि अनुराग कश्यप यांनी लिहिलेली आहे. या चित्रपटात ऐश्वर्य ठाकरेचे दमदार रोलमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण होत आहे. त्यांच्या सोबत वेदीका पिंटो, मोनिका पंवार, मोहम्मद झीशान अय्युब आणि कुमुद मिश्रा यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. निशांची दोन भाऊ आणि त्यांच्या टोकाच्या जीवनप्रवासाची कहाणी सांगतो- जिथे त्यांच्या निर्णयांचा परिणाम त्यांच्या नशिबावर कसा होतो हे पाहायला मिळेल. हा चित्रपट १९ सप्टेंबर २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



# बागी ४ चा टीझर रिलीज

गेल्या बऱ्याच दिवसांपासून अभिनेता टायगर श्रॉफच्या बहुप्रतिक्षित बागी ४ सिनेमाचा टीझर कधी रिलीज होणार याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. अखेर बागी ४ सिनेमाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये बागीच्या आधीच्या तिन्ही भागांपेक्षा या भागातील ॲक्शन वन लेव्हल अप अशा स्वरुपाची टीझरमधून तरी पाहायला मिळत आहे. टीझरमध्ये अभिनेता टायगर श्रॉफ फुल ऑन ॲक्शन मोडमध्ये शत्रूंवर क्रूरपणे हल्ला करताना दिसत आहे. त्याचा हा आक्रमक अवतार थरकाप उडवणारा आहे. १ मिनिट ४९ सेकंदांच्या टीझरमधून केवळ हिंसकपणाने गाठलेला क्रूरता दाखविण्यात आली आहे. या सिनेमात अभिनेता संजय दत्तही विशेष भूमिकेत असून त्याचा आक्रमकपणा अंगावर आणणारा आहे. येत्या ५ सप्टेंबर २०२५ या दिवशी बागी ४ थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. या सिनेमात संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत आहे. या सिनेमाचं दिग्दर्शन ए. हर्षा यांनी केले आहे आणि निर्मिती साजिद नाडियाडवाला यांनी केली आहे. या टीझरमध्ये रणबीर कपूरच्या ॲनिमल सिनेमात दाखविण्यात आलेले ॲक्शन सीन आणि बागी ४ सिनेमातील ॲक्शन सीनमध्ये काही प्रमाणात साम्य जाणवतं. हिरोईन के लिए हर हिरो को व्हिलन बनना ही पडता है! असा टीझरच्या शेवटी एक डॉयलॉग टायगर म्हणताना दिसतो. पण त्याअगोदर जे घडतं ते भयानक आहे, या सिनेमातील पात्रांच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू दिसत आहेत.

# 'मायासभा'मध्ये दिव्या

प्रसिद्ध अभिनेत्री दिव्या दत्ता बॉलिवूडमधील दमदार अभिनेत्री म्हणून ओळखली जाते, आता ती तेलगू मनोरंजनक्षेत्रात स्वत:च्या अभिनयाची जादू दाखवून देणार आहे. अभिनेत्री 'मायासभा' नावाच्या वेबसीरिजमधून तेलगू मनोरंजनक्षेत्रात पाऊल ठेवत आहे. या सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. या ट्रेलरमध्ये दिव्या दत्ता ही एका राजकीय नेत्याच्या रुपात दिसून येत आहे. राज्याचे नशीब बदलणारी ही कहाणी असल्याचे दिव्याने नमूद केले आहे. पहिली वेळ नेहमीच खास असते आणि मी दीर्घकाळापासून तेलगू मनोरंजनक्षेत्रात काम करू इच्छित होते. बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटांमधील वाढत्या ताळमेळी दरम्यान मला या सीरिजसोबत सुरुवात करण्याबद्दल गर्व आहे. दाक्षिणात्य पार्श्वभूमीची ही सीरिज अत्यंत आकर्षक असल्याचे तिने म्हटले आहे. ही सीरिज राजकीय पार्श्वभूमीवर आधारित आहे. सोनी लिववर ही सीरिज पाहता येणार आहे. यात साई कुमार, श्रीकांत अय्यंगर, नासर, तान्या रविचंद्रन, रविंद्र विजय आणि शत्रू यासारखे कलाकार दिसून येणार आहेत.



# या अभिनेत्रीने लॉन्च केला पाण्याचा ब्रँड

बॉलिवूडमधील अनेक अभिनेत्री बेझनेस वूमन बनल्या आहेत. यामध्ये आता आणखी एका अभिनेत्रीचा समावेश झाला आहे. प्रसिद्ध अभिनेत्री भूमी पेडणेकर हिने बिझनेसमध्ये पाऊल ठेवलं आहे. अशातच आता त्यांच्यापाठोपाठ प्रसिद्ध अभिनेत्री भूमी पेडणेकरनंही स्वत:चा पाण्याचा ब्रँड लॉंच केला आहे. या वॉटर ब्रँडचं नाव 'हिमालयन प्रीमियम वॉटर' आहे. या ब्रँडची किंमत खूप जास्त आहे. या वॉटर बॉटलमध्ये ५०० मिली आणि ७५० मिली असे दोन आकार आहेत. या ब्रँडची सर्वात महागडी बाटली ६०० रुपयांना विकली जात आहे. भूमी पेडणेकरनं न्यूज१८ सोबत बोलताना याविषयी सांगितलं आहे. काचेच्या आणि प्रीमियम प्लास्टिक बाटल्यांमध्ये ५०० आणि ७५० मिली बाटल्यांची किंमत ९० रुपयांपर्यंत कमी आहे आणि काचेची किंमत ६०० रुपयांपर्यंत जाते. दरम्यान, भूमी पेडणेकर ही पहिली अभिनेत्री नाही, जिने बिझनेस सुरू केला आहे. तर दीपिका, आलिया आणि करीना कपूरसह अनेक अभिनेत्रींनी त्यांचा स्वत:चा व्यवसाय सुरू करून मोठा नफा मिळवला आहे. यामुळे आता भूमीच्या या नव्या व्यावसायला कशा पद्धतीने ग्राहक प्रतिसाद देतात हे पाहणं महत्वाचं असणार आहे. २०१५ मध्ये भूमी पेडणेकर हिने 'दम लगा के हैशा' या सिनेमातून रुपेरी पडद्यावर एण्ट्री केली. तिने या सिनेमात केलेल्या भूमिकेची दखल प्रेक्षकांना घ्यायला भाग पाडलं. यानंतर तिने अनेक सिनेमांतून अभिनय करत प्रेक्षकांची मनं जिंकली. 'टॉयलेट एक प्रेम कथा' आणि 'शुभ मंगल सावधान' हे तिचे सिनेमे खूप गाजले. या सिनेमांनी तिला मोठी लोकप्रियता मिळवून दिली आहे.



# सुश्मिता सेनला मिळेना काम

भारताची पहिली 'मिस युनिव्हर्स' म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री सुश्मिता सेन हे अभिनय क्षेत्रातील देखील मोठं नाव आहे. अवघ्या १८ व्या वर्षी अभिनेत्रीने 'मिस युनिव्हर्स'चा खिताब जिंकला होता. त्यानंतर ती अभिनय क्षेत्राकडे वळली आणि बॉलिवूडमध्ये स्वतःला सिद्ध करुन दाखवलं. आजवर या अभिनेत्रीने अनेक सुपरहिट चित्रपट इंडस्ट्रीला दिले आहेत. अलिकडेच सुश्मिता सेनच्या 'ताली' या वेबसीरिजमुळे प्रचंड चर्चेत आली होती. या वेबसीरिजला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. परंतु, या अभिनेत्रीवर सध्या काम मागण्याची वेळ आली. याबाबत एका मुलाखतीमध्ये अभिनेत्रीने खदखद व्यक्त केली आहे. अलिकडेच सुश्मिता सेनने एक मुलाखत दिली. त्यादरम्यान, ८ वर्षांच्या ब्रेकनंतर पुन्हा एकदा काम करण्याची इच्छा होती, त्यामुळे मी अनेकांना फोन केले, असंही तिने सांगितलं. त्यावेळी अभिनेत्री म्हणाली, मी तेव्हा ॲमोझॉन, नेटफ्लिक्स तसेच हॉटस्टारच्या हेडला फोन केले. मी त्यांना म्हणाले, माझं नाव सुष्मिता सेन आहे. मी एक कलाकार आहे आणि मला पुन्हा काम करायचं आहे. कारण, मी जवळपास आठ वर्ष काम केलं नव्हतं, तो काळ माझ्यासाठी खूप मोठा होता. यादरम्यान, अभिनेत्री म्हटलं, या ब्रेकमुळे तिला आयुष्य म्हणजे काय असतं हे अनुभवता आलं आणि प्रत्येक कलाकारासाठी ही गोष्ट गरजेची असते. याच काळात सुश्मिताला हार्ट सर्जरी देखील करावी लागली होती. त्यानंतर तिने संपूर्ण लक्ष आपल्या आरोग्याकडे देण्यास सुरुवात केली. सुश्मिता सेनच्या कामबद्दल बोलायचं झालं तर 'मैं हू ना', 'बीवी नं-१' आणि 'मैंने प्यार क्यों किया' यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने काम केलं आहे. शिवाय ताली वेबसीरिजमध्ये तिने साकारलेली गौरी सावंत देखील प्रेक्षकांना भावली. याशिवाय तिने २०२० मध्ये आलेल्या 'आर्या' या सीरिजमध्ये काम केलं होतं.



# माधुरीसाठी 'या' अभिनेत्याने फुकट केला चित्रपट



बॉलिवूडची सर्वात ग्लॅमरस अभिनेत्री धकधक गर्ल माधुरी दीक्षित नेहमीच तिच्या सौंदर्यासाठी आणि अभिनयासाठी चर्चेत असते. तिच्या अभिनयासोबतच तिच्या नृत्य आणि सौंदर्याने चाहत्यांना जास्त वेड लावलं आहे. अनेक चाहते माधुरी दीक्षितच्या सौंदर्याचेही वेडे झाले आहेत. फक्त चाहतेच नाही तर कलाकार देखील. असाच एक अभिनेता आहे ज्याने पहिल्यांदा माधुरीला पाहिलं आणि तो माधुरीचे सौंदर्य पाहूनच घायाळ झाला. त्याने माधुरीसोबत चित्रपट साईन केला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या अभिनेत्याने त्या चित्रपटासाठी कोणतेही शुल्क घेतले नाही. माधुरी दीक्षितने ४० वर्षांपूर्वी बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. चार दशकांपूर्वी तिने १९८४ मध्ये आलेल्या 'अबोध' चित्रपटातून पदार्पण केले होतं. हा अभिनेता म्हणजे माधुरीच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला तिच्यासोबत काम करणारा अभिनेता शेखर सुमन आहे. दोघेही 'मानव हत्या' चित्रपटात दिसले होते. पण सुरुवातीला तो या चित्रपटात काम करण्यास तयार नव्हता. एका मुलाखतीत शेखर सुमन यांनी सांगितले होते की 'मानव हत्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सुदर्शन के रतन यांनी त्यांना फोन केला होता. त्यांनी चित्रपटाची ऑफर दिली. पण, त्यांनी सांगितले की ते पैसे देऊ शकणार नाहीत. अभिनेत्याच्या मते, दिग्दर्शक त्यांना पैसे देत नव्हते आणि त्याशिवाय माधुरी दीक्षित देखील त्यावेळी नवीन होती. सुदर्शनने शेखरला सांगितले होते की ती अभिनेत्री नवीन आहे आणि तिने राजश्रीसोबत 'अबोध'मध्ये काम केलं आहे. शेखर म्हणाला, ते पैसे देणार नाहीत, अभिनेत्री अनुभवी नाही. मग मी हा चित्रपट कसा करू. पण जेव्हा त्याने माधुरीला पाहिले तेव्हा त्याने लगेच आपला विचार बदलला. मग सुदर्शनने विचारले, तू काम करशील का? यावर अभिनेता म्हणाला, ती सुंदर आहे, मी नक्कीच हा चित्रपट करेल अशा पद्धतीने शेखरने हा चित्रपट फक्त माधुरीसाठीच केला ते देखील एकही रुपया न घेता. चित्रपटाच्या वेळी माधुरी आणि शेखर दोघेही बॉलिवूडमध्ये पूर्णपणे नवीन होते. शेखरने सांगितले होते की मानव हत्येच्या चित्रीकरणादरम्यान तो आणि माधुरी एकाच बाईकवरून प्रवास करत असत. शेखरने सांगितले होते की त्यावेळी तो आणि माधुरी मुंबईच्या एकाच परिसरात राहत होते. अभिनेता माधुरीला घेण्यासाठी त्याच्या बाईकवरून तिच्या घरी जात असे आणि शूटिंगनंतर अभिनेत्रीला घरी सोडत असे. तसेच शेखने माधुरीसोबत काम करण्याचा अनुभवाबद्दलही कौतुक केलं.



# मी बिपाशापेक्षा उत्तम

मृणाल ठाकूर सध्या तिच्या सन ऑफ सरदार २ या सिनेमामुळे चर्चेत आहे. टीव्हीपासून मृणालने तिच्या करिअरची सुरुवात केली होती. 'कुमकुम भाग्य' या मालिकेमुळे तिला प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर मृणाल अनेक सुपरहिट सिनेमांमध्ये दिसली. तिचा सीता रामम् हा सिनेमा प्रचंड गाजला. तिचा चाहता वर्गही प्रचंड मोठा आहे. मात्र आता मृणालचा एक जुना व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत आहे. यामध्ये तिने स्वतःची तुलना बिपाशा बासूशी केली आहे. या व्हिडीओमुळे नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं आहे. या व्हिडीओत मृणाल सहकलाकार आणि अभिनेता असलेल्या अरिजीतसोबत दिसत आहे. फिटनेसबद्दल ते दोघेही बोलत आहेत. अरिजीत मृणालला हेडस्टँड आणि पुश अप्सबद्दल सांगत आहे. त्यावर ती म्हणते की तुला अशा मुलीसोबत लग्न केलं पाहिजे जिचे मसल्स असतील. जा आणि बिपाशासोबत लग्न कर. त्यावर अरिजीत तिला म्हणतो की ती जर या शोमध्ये असती तर तुला रोलही मिळाला नसता. त्यावर मृणाल म्हणते की मी तिच्यापेक्षा उत्तम आहे. मृणालच्या या व्हिडीओवरुन नेटकऱ्यांनी तिला चांगलंच ट्रोल केलं आहे. ती हे खरंच बोलली का? तिच्याबद्दलचा आदर गेला, बिपाशा तुझ्यापेक्षा हजार पटीने चांगली आहे, तिच्याबद्दल ही असं का बोलली असेल, तुझ्यात बिपाशाचा बी पण नाही, अशा अनेक कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.



# दीपिका होणार अल्लू अर्जुनची हिरोईन

बॉलिवूडची दिग्गज अभिनेत्री दीपिका पादुकोण तिच्या दमदार अभिनयामुळे लोकांच्या मनावर राज्य करते. सध्या ती तिच्या आगामी प्रोजेक्ट्समुळे चर्चेत आहे. आता तिच्या बहुप्रतिक्षित चित्रपटाबद्दल एक मोठी अपडेट आली आहे, ज्यामध्ये ती एका दक्षिण सुपरस्टारसोबत दिसणार आहे. अभिनेता अल्लू अर्जुन सध्या ॲटलीसोबत भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठ्या चित्रपटांपैकी एक असलेल्या एए २२-ए-६ च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटाचे बजेट खूप मोठे असल्याचे म्हटले जाते. चित्रपटाच्या ॲक्शन सीन्सना चांगल्या प्रकारे डिझाइन करण्यासाठी निर्मात्यांनी आंतरराष्ट्रीय क्रूची नियुक्ती केली आहे. चित्रपटाच्या बजेटप्रमाणेच, त्यातील कलाकारही थोडे मोठे आहेत. अल्लूसोबत, दीपिका पादुकोण, रश्मिका मंदान्ना, जान्हवी कपूर आणि मृणाल ठाकूरसारखे अनेक उत्तम कलाकार या चित्रपटात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे हा एक बिग बजेट सिनेमा असल्याचं बोललं जात आहे. दीपिका पादुकोण नोव्हेंबरमध्ये अल्लू अर्जुन आणि ॲटलीसोबत चित्रपटाचे शूटिंग सुरू करणार आहे. अभिनेत्री दीपिकाने चित्रपटाची तयारी सुरू केली आहे आणि ती नोव्हेंबर २०२५ पासून सेटवर येण्यास सुरुवात करेल. या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी दीपिकाला १०० दिवस लागतील. दीपिकाच्या व्यक्तिरेखेसाठी एक खास योद्धा लूक आणि शस्त्र देखील तयार करण्यात आले आहे. अल्लू अर्जुन चित्रपटात अनेक वेगवेगळ्या लूकमध्ये दिसणार आहे. याचा अर्थ असा की तो चित्रपटात वेगवेगळ्या भूमिका साकारणार आहे. ॲटलीचा हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात तांत्रिकदृष्ट्या प्रगत चित्रपट असेल. एए २२- ए-६ च्या चित्रपटाचे चित्रीकरण सप्टेंबर २०२६ पर्यंत चालेल आणि निर्माते २०२७ च्या सुरुवातीला तो मोठ्या पडद्यावर आणू शकतात. अल्लू अर्जुनने ॲटलीच्या चित्रपटासाठी त्याचे कॅलेंडर लॉक केले आहे आणि तो या चित्रपटासाठी कठोर परिश्रम करत आहे.

# 'कांतारा: चॅप्टर १'मध्ये 'या' अभिनेत्रीची एन्ट्री

२०२२ साली रिलीज झालेल्या 'कांतारा' सिनेमा चांगलाच गाजला. अनपेक्षितरित्या या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर तुफान यश मिळवलंच शिवाय प्रेक्षकांचं प्रेमही मिळवलं. हा चित्रपट भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवरही चर्चेचा विषय ठरला होता. आता 'कांतारा' सिनेमाचा प्रीक्वल अर्थात 'कांतारा: चॅप्टर १' येतोय. 'कांतारा: चॅप्टर १'चं मोठं अपडेट समोर आलं आहे. या सिनेमामध्ये अभिनेत्री रुक्मिणी वसंत हिची एन्ट्री झाली आहे.

'सप्त सागरदाचे एल्लो' या चित्रपटातील तिच्या अफलातून अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकून घेतल्यानंतर आता रुक्मिणी ऋषभ शेट्टीसोबत काम करणार आहे. रुक्मिणीसाठी हा अनुभव म्हणजे अगदीच स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासारखा आहे. आपल्या भावना व्यक्त करताना रुक्मिणी म्हणाली की, गेल्या वर्षाच्या सुरुवातीलाच मला या चित्रपटासाठी विचारणा झाली. त्यावेळी मी ऋषभ सरांना भेटले. त्यांनी मला चित्रपटाची कथा सांगितली आणि अत्यंत नम्रपणे विचारले की, 'तुम्हाला या प्रोजेक्टचा भाग व्हायला आवडेल का?' खरं सांगायचं तर, माझ्यासाठी तो क्षण म्हणजे स्वप्न साकार झाल्यासारखा होता. रुक्मिणीने पुढे सांगितले, 'सप्त सागरदाचे एल्लो' च्या यशानंतर ऋषभ शेट्टी यांनी कौतुक केलं. प्रीमियरलाही मला प्रोत्साहन दिले. यानंतर त्यांनी मला इतक्या चर्चेतल्या आणि मोठ्या सिनेमात काम करण्याची संधी दिली, ही गोष्ट माझ्यासाठी खूपच खास आहे. शिवाय, 'कांतारा: अ लेजेंड चॅप्टर १' मध्ये निवड झाल्याची बातमी गुप्त ठेवणे तिच्यासाठी खूप कठीण होतं, असं रुक्मिणीने सांगितलं. ती म्हणाली, ज्या दिवशी हे निश्चित झाले, त्या दिवशी मला ओरडून सांगावसं वाटलं होतं. पण योग्य वेळेची वाट पाहणे महत्त्वाचे होते, त्यामुळे ही बातमी स्वत:पुरती ठेवली होती. मला सतत माझ्या पुढच्या कन्नड प्रोजेक्टबद्दल विचारणा व्हायची. तेव्हा मला अनेक वेळा सगळं काही सांगावं वाटायचं. आता अखेर ही बातमी बाहेर आल्यामुळे मला खूप समाधान आणि आनंद होत आहे.



# प्लास्टिक सर्जरीची दुकान म्हणणाऱ्यांना श्रुती हासनचं सडेतोड उत्तर



साऊथ सुपरस्टार थलायवा रजनीकांत यांचा 'कुली' सिनेमा नुकताच रिलीज झाला आहे. रजनीकांत यांचा सिनेमा म्हटलं की कमालीची क्रेझ असतेच. या सिनेमात कमल हासन यांची मुलगी श्रुती हासनचीही भूमिका आहे. श्रुती हासनला अनेकदा प्लास्टिक सर्जरीवरुन टोमणे मारले जातात. बऱ्याच वेळा ती ट्रोल झाली आहे. मात्र श्रुती प्रत्येक वेळी रोखठोक उत्तर देताना दिसते. आताही तिने प्लास्टिक सर्जरीची दुकान म्हणणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिलं आहे. श्रुती म्हणाली, कॉस्मॅटिक सर्जरीवरुन माझ्यावर बरेचदा टीका झाली. जेव्हा मी याविरोधात आवाज उठवला तेव्हा कमेंट्स आल्या की,'ओह, ही तर प्लास्टिक सर्जरीची दुकान आहे'. पण मला माहितीये की मी नक्की काय केलंय आणि किती केलंय. तसंच दुसऱ्यांनीही किती काय काय केलंय याची मला कल्पना आहे. प्रामाणिकपणाची इथे किंमत चुकवावी लागते. ठीकच आहे. मी कधीच याचं प्रमोशन करत नाही. हा माझा निर्णय आहे. मला कोणावर लादायचा नाही. ती पुढे म्हणाली, प्रेमात, आयुष्यात, कामात जर तुम्ही खरं बोलत असाल किंवा कोणाचं सत्य सांगत असाल तर नेहमीच तुमच्यावर बोट दाखवलं जातं. याची किती चांगली किंमत चुकवावी लागते. श्रुती हासन सध्या 'कुली' सिनेमाचं यश एन्जॉय करत आहे. लोकेश कनगराज यांनी सिनेमा दिग्दर्शित केला आहे. हा एक ॲक्शन थ्रिलर आहे. देशातच का परदेशातही या सिनेमाची हवा आहे. १४ ऑगस्ट रोजी रिलीज झालेल्या या सिनेमाने आतापर्यंत जगभरात ४०० कोटींचा गल्ला जमवला आहे.

# पुन्हा एकदा घुमणार घुंगरांचा नाद!

'दशावतार' स्वप्न प्रत्येकजण पाहत असतो. कुणी आई-वडिलांचं, कुणी स्वतःच तर कुणी पत्नीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपडत असतं. स्वप्न पाहणं आणि ते पूर्ण करणं यांत खरं साहस आहे. स्वप्न पूर्ण करण्यात लागलेल्या एका किसनाची कथा लवकरच मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. नुकतंच झिंग या सिनेमाचं पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीस आलं. गावातील उनाड पण मनाने सच्चा आणि स्वप्नवेड्या किसनाच्या वडिलांचं अपूर्ण राहिलेलं तमाशाचा फड उभारण्याचं राहिलेलं स्वप्न उराशी बाळगणार्या या मेहनती लेकाचा प्रवास झिंग या नव्याकोर्या 'झिंग' या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. येत्या १९ सप्टेंबरपासून हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात ही मैफिल किसना कशी रंगवणार हे पाहणं या चित्रपटात रंजक ठरेल. आजोबांचा विरोध, गावकऱ्यांचा अविश्वास आणि पाटलांचं राजकारण यांतून मार्ग काढत किसना वडिलांचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी रंगमंच गाजवणार का?, हा कठीण प्रवास तो पार करणार का? हे सारं चित्रपटात पाहायला मिळेल. बरं चित्रपटात दिसणारा हा किसना नेमका कोण आहे, ही रंगतदार भूमिका कोण साकारतय याकडे सार्‍यांच्या नजरा लागून राहिल्या आहेत. शिवाय चित्रपटात आणखी कोणते कलाकार दिसणार हेदेखील अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. गावच्या मनात प्रेम, जिद्द आणि कलेचं बीज किसना पेरु शकेल का? की, हे सगळं फक्त त्याच्या स्वप्नांपुरतच सिमीत राहील याचाही उलगडा लवकर होईल. पण सिनेमाचं पोस्टर पाहून ही अभिनेत्री कोण अशी चर्चाही सोशल मीडियावर पाहायला मिळतेय. काहींनी पोस्टरवरून शिवाली परबचं नाव घेतलं आहे तर काहींनी अमृता खानविलकरच नाव घेतलं आहे. पण ही अभिनेत्री कोण असणार ? हे उघड होण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागेल. 'ड्रीम लालटन प्रॉडक्शन' आणि 'रेडब्रिक्स मोशन पिक्चर' या प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत निर्माते दिपक पेटकर आणि सौरभ किरणकुमार कुंभार निर्मित 'झिंग' हा चित्रपट दिग्दर्शक अमित वाल्मिक कोळी दिग्दर्शित आहे. तर हा संपूर्ण चित्रपट प्रताप जोशी यांनी त्यांच्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. तर संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत या चित्रपटाला लाभले आहे. मुकुंद भालेराव, मंदार चोळकर आणि शुभम चौधरी यांनी गाण्याचे बोल लिहिले आहेत. तर नृत्य दिग्दर्शक म्हणून आशिष पाटील यांनी बाजू सांभाळली आहे. 'झिंग' हा चित्रपट संगीतमय मैफिलीत अनेक रंग भरणारा आहे. येत्या १९ सप्टेंबरपासून हा चित्रपट जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होईल.





'गाढवाचं लग्न' चित्रपट रिलीज होऊन बराच काळ उलटला आहे, तरीदेखील या सिनेमाचं कथानक आणि पात्र रसिकांच्या मनात घर करुन कायम आहे. या चित्रपटात मकरंद अनासपुरे यांनी सावळ्या कुंभाराची भूमिका साकारली होती. तर राजश्री लांडगे हिने त्यांच्या पत्नीची म्हणजे गंगीची भूमिका साकारली होती. राजश्री सोशल मीडियावर सक्रीय असून ती या माध्यमातून चाहत्यांना अपडेट देत असते.

नुकतेच तिने एका मुलाखतीत तिला इंडस्ट्रीतल्या ग्रुपने बाजूला केलं, अशी खंत व्यक्त केली. अभिनेत्री राजश्री लांडगेचे आजोबा कर्मवीर मारुतीराव लांडगे राजकारणी तर वडील पाटबंधारे खात्यात सचिव आहेत. अभिनेत्री सध्या इंडस्ट्रीतून गायब असून तिने समाजकारण, राजकारणाची वाट धरली आहे.

# मी साकारलेली 'गंगी' भावली नसती...

अभिनेत्रीने दिलेल्या एका मुलाखतीत खंत व्यक्त केली. ती म्हणाली की, मराठी सिनेइंडस्ट्रीतील ग्रुपने मला कायम बाजूला ढकललं. 'तुम्ही काय बाबा राजकीय, तुमच्याकडे जमिनी, शेती असेल... इथे आम्हाला काम करू दे, तुमचं काय?' मग हे तुम्ही रितेश देशमुखला म्हणू शकता का असं? तो माझ्याच समाजाचा आहे, ३ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्याचा मुलगा. रितेशपेक्षा या इंडस्ट्रीत असं कोण मोठं आहे? कोण आहे मोठं! आम्हाला त्याचं प्रचंड भूषण आहे, कशाला लाज वाटली पाहिजे? तुम्ही त्यांना सांगू शकता का, 'तुमच्याकडे सगळंच आहे तुम्ही कशाला इंडस्ट्रीत काम करता' त्यांचं बॅकग्राउंड कितीही मोठं असू दे. शेवटी त्यांचं वागणं, काम करणं यामुळेच ते लोकप्रिय आहेत ना. ती पुढे म्हणाली की, बॉलिवूडमध्ये ते फक्त मुख्यमंत्र्यांचा मुलगा म्हणून प्रसिद्ध आहेत का? त्यांचं चांगलं वागणं, चांगलं काम करणं हे तुम्ही काढून नाही घेऊ शकत. तसंच मी साकारलेली 'गंगी' भावली नसती, केवळ माझ्या बॅकग्राउंडमुळे मी गाजू शकले असते का? हे सगळं खोटं आहे, हा ज्याचा त्याचा स्ट्रगल आहे, तुम्ही कामावर बोला. कॅमेऱ्याला माहीत नाही की राजश्री लांडगे कोणाची मुलगी आहे, कॅमेऱ्याला दिसत नाही की रितेश देशमुख कोणाची व्यक्ती आहे त्याला फक्त अभिनय दिसतो आणि ती भूमिका दिसते.

# गश्मीर महाजनीची 'ही' अभिनेत्री क्रश

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी आपल्या देखण्या लूक आणि दमदार अभिनयामुळे नेहमीच चर्चेत असतो. मालिकांपासून ते चित्रपटांपर्यंत आणि रिॲलिटी शोपर्यंत गश्मीरने नेहमीच आपल्या कामगिरीने चाहत्यांना प्रभावित केलं आहे. ऑनस्क्रीन त्याच्या रोमँटिक अदा चाहत्यांना भावतातच, पण ऑफस्क्रीनही तो आपल्या व्यक्तिमत्त्वाने सगळ्यांना भुरळ घालतो.गश्मीर महाजनी अनेक तरुणींच्या हृदयावर राज्य करतो. तो अनेकींचा क्रश आहे. मात्र, स्वतः गश्मीरची क्रश कोण आहे, याबद्दल खुलासा केलाय. एक लोकप्रिय मराठी अभिनेत्री त्याची क्रश असल्याचं अभिनेत्यानं सांगितलं आहे. गश्मीर हा अनेकदा त्याच्या सोशल मीडियावर सेशन घेत असतो. नुकतंच त्याने इन्स्टाग्राम सेशन घेतलं होतं. या सेशनमध्ये चाहत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्याने उत्तरं दिली. या सेशनमध्ये गश्मीरला चाहत्याने मराठी चित्रपटसृष्टीत तुझी क्रश कोण आहे? असं विचारलं. चाहत्याच्या या प्रश्नाचं उत्तर देताना गश्मीरनं लोकप्रिय अभिनेत्री आश्विनी भावे यांचं नाव घेतलं. तो म्हणाला, मला वाटतं की, आश्विनी भावे मॅडम त्यांच्या काळात आणि आतासुद्धा माझ्या क्रश आहेत. यासोबतच त्याला तुझी आवडती सहअभिनेत्री कोण आहे? असा प्रश्न एका चाहत्यानं केला. यावर गश्मीर हसण्याच्या इमोजीही शेअर करत म्हटलं माझी पत्नी. ती खूप अभिनय करते. गश्मीरच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर त्याने आतापर्यंत 'सरसेनापती हंबीरराव', 'देऊळ बंद', 'विशू', 'डोंगरी का राजा' अशा सिनेमांमध्ये काम केलं आहे. शिवाय तो हिंदी मालिकांमध्ये झळकला आहे. अभिनय क्षेत्र गाजवल्यानंतर आता गश्मीर दिग्दर्शनात पहिलं पाऊल टाकलंय. यासोबतच तो लेखक आणि निर्मात्याची बाजूही सांभाळताना दिसणार आहे.



# हिना खानची नवी सुरुवात

अभिनेत्री हिना खान कॅन्सरशी लढा देत असून या कठीण काळातील प्रत्येक गोष्ट ती चाहत्यांसोबत शेअर करताना दिसते. अलीकडेच ती लग्नबंधनात अडकली. त्यानंतर आता हिना 'पती पत्नी और पंगा' या रिलिटी शोमधून तिचा पती रॉकी जैस्वालसोबत पुन्हा प्रेक्षकांसमोर येणार आहे. कॅन्सरचे निदान झाल्यानंतर अनेक सहकाऱ्यांनी तिला मानसिक आधार दिला होता. कॅन्सरशी सामना करताना तिला काही काळापर्यंत अभिनयापासून दूर राहावं लागलं होतं. मात्र आता ती पुन्हा कामाच्या दुनियेत परतण्याचा निर्धार करून सज्ज झाली आहे. हिनाने 'ये रिश्ता क्या कहलाता है,' 'खतरों के खिलाडी ८' आणि 'बिग बॉस ११' यांसारख्या शोमधून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता 'पती पत्नी और पंगा'च्या माध्यमातून ती नवा टप्पा गाठणार आहे. लग्नानंतर पती रॉकी जैस्वालसोबत तिचा हा पहिला प्रकल्प आहे. ११ वर्षांच्या रिलेशनशिपनंतर हिना आणि रॉकी लग्नबंधनात अडकले आहेत. दोघांनीही २०१४ मध्ये डेट करण्यास सुरुवात केली. रॉकीने प्रत्येक अडचणीत हिनाची साथ दिली. कर्करोगाशी तिची सुरू असणारी झुंज म्हणा अथवा हिनाच्या वडिलांचे निधन झाले तेव्हाही रॉकी तिच्यापाठी खंबीरपणे उभा राहिला होता.



# स्मृती सर्वाधिक मानधन घेणाऱ्या टीव्ही अभिनेत्री

टेलिव्हिजन जगतातील एक काळ गाजवलेली मालिका 'क्योंकि सास भी कभी बहू थी' पुन्हा एकदा नव्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. तब्बल १७ वर्षांनंतर, ही मालिका 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' या नावाने दि. २९ जुलै २०२५ पासून प्रसारित झाली आहे. या मालिकेची ओळख असलेली 'तुलसी' अर्थातच स्मृती इराणी पुन्हा चर्चेत आली आहे. तिच्या या भूमिकेने ती घराघरात पोहोचली होती आणि भारतीय टेलिव्हिजनमध्ये एका आदर्श सूनबाईची प्रतिमा निर्माण केली होती.




२००८ मध्ये या मालिकेचा पहिला सीझन संपला होता. शेवटच्या भागात तुलसीने आपल्या मुलाचा अनुजचा खून केला होता, कारण तो एका तरुणीवर बलात्कार करणार होता. कोर्टात हे उघड झाल्यानंतर कथेत २० वर्षांची उडी घेतली गेली होती आणि पुढच्या पिढ्यांची कहाणी दाखवण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार, स्मृती इराणी 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' शोच्या प्रत्येक एपिसोडसाठी १४ लाख रुपये फी घेत आहेत, ज्यामुळे त्या भारतीय टेलिव्हिजनवरील सर्वात जास्त मानधन घेणार्या अभिनेत्री बनल्या आहेत. तसेच, या शो चे १५० एपिसोड प्रसारित होणार आहेत, त्यामुळे स्मृती ईरानी 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' मधून तब्बल २१ कोटी रुपये कमावणार आहेत. स्मृती ईरानीने फीच्या बाबतीत बॉलिवूडच्या टॉप अभिनेत्री दीपिका पादुकोणलाही मागे टाकले आहे. सांगितलं जातं की, दीपिकाला शाहरुख खानच्या 'पठान' चित्रपटासाठी १५ कोटी रुपये फीस मिळाली होती, तर स्मृती ईरानी 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' शोमधून २१ कोटी रुपये कमावणार आहेत. या सोबतच 'अनुपमा' या शोच्या लीड अभिनेत्री रूपाली गांगुलीला दर एपिसोडसाठी सुमारे ३ लाख रुपये मिळतात. हिना खानची फीस २ लाख रुपये पर्यंत आहे, आणि 'तारक मेहता का उल्टा चश्मा' शोमध्ये जेठालालचा भूमिका करणारे दिलीप जोशी दर एपिसोडसाठी १.५ लाख रुपये घेत आहेत. त्यामुळे या सर्व कलाकारांच्या रेसमध्ये स्मृती इराणी पुढे असल्याचं दिसून येत आहे.

# थंडबस्त्यात गेला अनुष्काचा 'चकदा एक्सप्रेस' सिनेमा

अभिनेत्री अनुष्का शर्माने लेक वामिकाच्या जन्मानंतर दोन वर्षांनी कोविड दरम्यान तिचा पहिला ओटीटी चित्रपट 'चकदा एक्सप्रेस'ची घोषणा केली होती. त्यानंतर तिचे चाहते खूप खूश झाले होते. मात्र आता ७ वर्षांनंतरही हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेला नाही. चाहत्यांना आशा होती की हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होईल, परंतु आता त्यांच्या इच्छाही धुळीस मिळाल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून अनुष्काचा चकदा एक्सप्रेस" थंडबस्त्यात गेल्याच्या बातम्या येत आहेत. अभिनेत्री रेणुका शहाणे देखील या चित्रपटात काम करत होती. तिने अलीकडेच चित्रपट रिलीज होणार नाही कळताच त्यावर प्रतिक्रिया दिली. रेणुका शहाणेने म्हटले, मला हे माहित नव्हते, हे जाणून मला खूप धक्का बसला आहे. चकदा एक्सप्रेस हा एक सुंदर आणि प्रभावी चित्रपट आहे जो खूप मनापासून बनवला गेला आहे. हे कळल्यावर माझे मन दुखावले आहे. या चित्रपटासाठी सर्वांनी खूप मेहनत घेतली आहे. अनुष्का शर्मानेही या चित्रपटासाठी खूप मेहनत घेतली आहे आणि माझे सीन्स खूप शक्तिशाली आणि प्रभावी होते. चित्रपटाबद्दल पुढे बोलताना रेणुका शहाणे म्हणाल्या, झुलन गोस्वामी हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे, ज्या गरीब कुटुंबातून असूनही त्यांनी मोठे यश मिळवले. पुरुष आणि महिला क्रिकेटमध्ये अजूनही तफावत असतानाही त्यांनी एक छाप सोडली आहे, मी फक्त एवढेच सांगू इच्छिते की चकदा एक्सप्रेसमध्ये ती खिलाडूवृत्ती होती. 'चकदा एक्सप्रेस'मध्ये अनुष्का शर्मा चित्रपटात माजी महिला क्रिकेट संघाची कर्णधार झुलन गोस्वामी यांची भूमिका साकारणार होती. या भूमिकेत स्वतःला साकारण्यासाठी तिने झुलन गोस्वामीच्या देहबोलीपासून ते तिच्या क्रिकेट खेळण्याच्या शैलीपर्यंतच्या प्रत्येक पैलूला उत्तम प्रकारे टिपले होते. चित्रपट थंडबस्त्यात गेल्याच्या बातमीने केवळ रेणुकाचंच नाही तर चाहतेही नाराज झालेत.





# संगीतकार मदनमोहन

**'आज सोचा तो आंसू भर आए मुद्दतें हों गई मुस्कुराये हर कदम पर उधर मुड़कर देखा उनकी महफिल से हम उठ तो आए आज सोचा तो आंसू...' १९७३ सालच्या 'हसते जख्म' चित्रपटातील भावमधुर गीत लता मंगेशकर यांनी गायले आहे. धृपदानंतरचे मदनमोहनचे संगीत व रईसखानची सतार नायिकेच्या नाराज भाव प्रकट करतात. 'दिल की नाजुक रगें टूटती हैं...' कैफी आझमी यांच्या शब्दातील आशय मदनमोहनच्या संगीतातील जणू सजीव रूपच. 'आपकी नजरोने समझा प्यार के काबील मुझे...' लता व मदन यांच्या कमालीच्या सौहार्द्राच्या काळात निर्माण झालेले हे गझलसदृश गाणे दरबारी रागात मेन्डोलीनच्या साथीत स्वरकोकिळेकडून शब्दशः आळवून घेतले आहे. स्वरानंदाची ठेव असलेल्या या गाण्यावर आपले सर्व संगीत ओवाळून टाकावे, असे दिग्गज संगीतकार नौशाद म्हणाले होते.**

जुन्या पिढीतील ख्यातनाम चित्रपटतज्ज्ञ व समीक्षक वसंत पोतदार यांच्या मते माधुर्य घराण्यात मदनमोहन यांचे संगीत येते. आजही काही गाणी मेलडीयुक्त होतात, पण अशा घसरण होत आहे. 'वो भूली दास्ता लो फिर याद आ गयी...' 'संजोग' चित्रपटातील विरहणीच्या अंगाने जाणारे हे थीमसदृश गाणे कोण विसरेल? या गाण्यात अंतरा गायला जेवढा काळ लागतो तेवढा वेळ मधले संगीत आहे. मदनमोहन यांच्या चाली गायला अवघड असत, पण गातांना मधुर रसपान व्हायचे. मदनमोहन हे किराणा घराण्याच्या संगीत विदुषी रोशन आरा यांच्या संगतीत काही काळ संगीत शिकले. त्यांच्या सत्संगात राहून गाण्यामध्ये सुरेल आक्रमक स्वरफेकीचे तंत्र अवगत केले.

मधुर संगीताचे बादशहा मदनमोहन यांचा जन्म २५ जून १९२४ रोजी इराक देशातील बगदाद येथे झाला. हिंदी चित्रपटसृष्टीतील फिल्मीस्तान कंपनीचे भागीदार रायसाहेब चुनीलाल कोहळी हे त्यांचे वडील होते. मदन यांना बालपणापासूनच स्वरांचे प्रेम होते. मात्र वडिलांच्या आग्रहाने वयाच्या १८ व्या वर्षी ते दाखल झालेत. तो ब्रिटिशांचा काळ होता. दुसरे महायुद्ध सुरू होते. पुढे एक वर्षातच रणांगण सोडून संगीताचे प्रांगण पसंत केले. मस्तकात सुरेल 'सरगम' पिंगा घालीत होती. फैजखांसाहेब, अब्दुलवहिदखासाहेब, सरोदवादक अली अकबरखांसाहेब तसेच रोशनआराबेगम व गझल सम्राज्ञी बेगम अख्तर आर्दीकडून अभिजात संगीत संस्कार घेतलेत. अख्तरी बाईंनी त्यांना गझल संगीताचा बादशहाच बनविले. वयाच्या २१ व्या वर्षी लखनौ आकाशवाणीवर सुगम संगीताचे निर्माते झाले. १९५० साली निर्माते देवेंद्र गोयल यांनी सर्वप्रथम त्यांच्या 'आँखे' चित्रपटात संगीतकार म्हणून दिली. 'मोरी अटरिया पे कागा बोले'- गायिका मीना कपूर. 'प्रीत लगाके मैने ये फल पाया' गायक मुकेश. चित्रपटातील त्यांची ही गाणी खूप गाजलीत. याच वर्षी त्यांचा विवाह शीला धिंग्रा यांच्याशी झाला. पुढे या दाम्पत्याला संजीव व समीर ही मुले झालीत. मदनमोहन यांचा माधुर्य घराण्याचा संगीत प्रवास १९५० पासून झाला. 'सपनो मे सजनसे दो बाते कुछ याद रहे कुछ भूल गये' १९५७ सालच्या 'गेट वे ऑफ इंडिया' चित्रपटातील ही गीते लता मंगेशकरच्या पहिल्या १० उत्कृष्ट गीतांपैकी आहे.

तलत मेहमूद हेही मदनमोहन यांचे आवडते गायक होते. कारण तेही गझल गायकीत श्रेष्ठ होते. 'जहाँ आरा' चित्रपटात तलत मेहमूद यांच्याकडून खालील मधुर गाणी गाऊन घेतलीत. 'तेरी आंख आंसु पी जाऊ', 'फिर वही श्याम वही गम', 'मै तेरी नजर का सुरूर हूँ', 'ऐ सनम आज ये कसम खाये' हे लता यांच्या सोबत गायले आहे. 'तुम जो मिल गये हो तो ये लगता है कि जहाँ मिल गया इक भटके हुए राही को कारवा मिल गया...' 'हसते चित्रपटातील हे द्वंद्वगीत मोहम्मद रफींनी गायले आहे. याची सुरुवात भूपेंद्रच्या गिटारच्या बारा स्टिंगच्या साथीत होते. पण भूपेंद्र अडखळले व निराश झाले. मदन यांनी गिटारला असे संगीतात बसवले होते की, एका वेळी दोन नोट्स सांभाळल्या जातील. मदनने भूपेंद्रच्या पाठीवर थाप दिली व म्हणाले की, 'तू माझ्या अपेक्षेपेक्षा छान वाजविले.' असे मदनमोहन!

'कर चले हम फिदा, जानो तन साथीयो अब तुम्हारे हवाले वतन साथीयो...' रणांगणावर शत्रूच्या आक्रमणाचा प्रतिकार करताना हुतात्मा शूर सैनिकांची कैफियत सांगणारे मोहम्मद रफींनी गायलेले हे गाणे मदनमोहन यांनी हृदय हेलावून टाकणार्‍या संगीतात बांधले. हे गाणे स्वातंत्र्य दिनाचे सिग्निचर ट्यून बनले.

'झुमका गिरा रे बरेली के बाजार मे' (मेरा साया) आशा भोसले यांच्या या गाण्याविषयी काय बोलावे? खट्याळ, चटपट्या स्वरांची आतषबाजी करून मदन यांचे संगीत सार्थ केले. मदनमोहन यांनी ८६ ७०० च्या वर गाणी दिलीत. त्यापैकी २५ चित्रपट तर केवळ त्यांच्या मधुर गाण्यांमुळे चाललीत. त्यांनी प्रामुख्याने राजेंद्र कृष्ण, राजा मेहंदी अली खां व कैफी आझमी यांचा गीतकार म्हणून उपयोग करून घेतला. १९७१ साली सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा एकमेव राष्ट्रीय पुरस्कार 'दस्तक' चित्रपटासाठी त्यांना मिळाला. एवढ्या महान संगीतकाराला एकही फिल्म फेअर नये, याची खंत वाटते.

आर्थिक व्यवहाराकडे संपूर्ण कल असऱ्या या निर्मात्यांचे संगीतातील सौंदर्याशी काय नाते. या जादूगार संगीतकाराला निर्मात्यांचा असहकार तसेच अनेक सहकार्यांचा मत्सर जाणवू लागला. त्यांच्याशी जुळवून घेणे शक्य न झाल्याने दारूचे व्यसन जवळ केले. उत्कृष्ट दर्जाची सृजनशीलता असूनही व मधाळ चालींनी रसिकांना नशा आणणार्‍या मदनमोहनने स्वतः मात्र मद्याची पसंत केली. १४ जुलै १९७५ रोजी आपली संगीत कला सादर करण्यासाठी या जगाचा निरोप घेऊन स्वर्गाचे दार ठोठावले. खालील अभिलाषा बाळगून. हमारे बाद अब मेहफिल में, अफसाने बया होंगे, न हम होंगे न तुम होंगे...

**रमेश पोफळी**

# आता कृष्ण, चाणक्य आणि कर्ण व्हायचंय!



चित्रपट आणि रंगभूमीवर आपल्या दमदार अभिनयाने छाप पाडणारे आशुतोष राणा सध्या त्यांच्या नाटक 'हमारे राम' आणि आगामी चित्रपट 'हीर एक्स्प्रेस' मुळे चर्चेत आहेत. एका चॅनेलशी संवाद साधताना त्यांनी आपल्या अनुभवांबद्दल आणि आजच्या नव्या कलाकारांविषयी मत व्यक्त केले. आशुतोष राणा म्हणाले, फक्त १४ महिन्यांत आम्ही १६ राज्यांमध्ये २६० शो केले. थिएटरच्या इतिहासात इतक्या कमी वेळेत इतके शो होणं मोठी उपलब्धी आहे. दुबईतही शो हाऊसफुल झाला. प्रेक्षकांचा मिळालेला प्रतिसाद मोठ्या चित्रपटाच्या यशाइतकाच वाटतो. या चित्रपटात त्यांनी उमेश शुक्ला दिग्दर्शित भूमिकेत काम केलं. राणा म्हणाले, प्रत्येक चित्रपट माझ्यासाठी नवी संधी असते. उमेश शुक्ला कलाकाराला स्वातंत्र्य देतात आणि योग्य वेळी मार्गदर्शन करतात. गुलशन ग्रोवरसारख्या उत्तम अभिनेत्यासोबत काम करणं अविस्मरणीय होतं. तसेच नवे कलाकार प्रीत आणि दिवितासोबतही काम करून खूप शिकायला मिळालं. रावणाची भूमिका केल्यानंतर आता आशुतोष राणा यांची इच्छा आहे की ते कृष्ण, चाणक्य, कर्ण आणि परशुराम यांच्या भूमिका साकार करायच्या आहेत. ते म्हणाले, कृष्ण फक्त देव नाहीत, तर जीवनाला दिशा देणारे तत्त्वज्ञ आहेत. चाणक्याचं ज्ञान आजही उपयोगाचं आहे. कर्ण हा महाभारतातील सर्वात शोकांत पण महान योद्धा आहे. परशुराममध्ये शक्ती आणि तपस्या यांचं अद्भुत मिश्रण आहे. हे सगळे पात्र समाजाला दिशा देणारे आहेत आणि मला त्यांना साकारण्याची खूप इच्छा आहे. नव्या पिढीबद्दल बोलताना ते म्हणाले, आजच्या कलाकारांकडे थिएटर, सिनेमा, टीव्ही, ओटीटी आणि सोशल मीडिया असे अनेक पर्याय आहेत. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मात्र तोच कलाकार टिकतो, ज्याच्याकडे प्रतिभा आणि मेहनत दोन्ही आहेत. सोशल मीडिया फक्त तुमची उपस्थिती दाखवतो, पण खरा कलाकार तोच जो संधी मिळाल्यावर निष्ठेने आणि प्रामाणिकपणे काम करतो.

# रितेश म्हणून सतत मल्टीस्टारर सिनेमांत काम करतो

अभिनेता रितेश देशमुख गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून इंडस्ट्रीमध्ये सक्रिय आहे. या काळात त्याने वेगवेगळ्या शैलीतील अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तथापि, रितेश त्याच्या कारकिर्दीत काही फ्रँचायझी चित्रपटांचा भाग देखील राहिला आहे, ज्यामुळे त्याच्या कारकिर्दीत हिट चित्रपट आले आहेत. यामध्ये 'हाऊसफुल' आणि 'मस्ती' सारख्या फ्रँचायझी चित्रपटांचा समावेश आहे. तो पुन्हा एकदा 'मस्ती'च्या चौथ्या भागातही दिसणार आहे. आता या फ्रँचायझी चित्रपटांबद्दल बोलताना, अभिनेताने त्यांना त्याच्यासाठी भाग्यवान म्हटले आहे. अभिनेता रितेश देशमुखने त्याच्या कारकिर्दीत फ्रँचायझी चित्रपटांमध्ये काम करण्याबद्दल सांगितले. अभिनेता म्हणाला की जर तो एखाद्या फ्रँचायझीचा भाग असेल किंवा एखाद्याचा दुसरा भाग बनवला असेल तर मला वाटते की प्रत्येक अभिनेता भाग्यवान वाटला पाहिजे. तुम्हाला माहिती आहे की सध्या मी कदाचित ४ चित्रपट करत आहे. अशा चित्रपटांचा भाग असणे मला खूप भाग्यवान वाटते जे लोकांना इतके आवडतात की आपण तिसरा आणि चौथा भाग बनवू शकलो आहोत. हे सर्व प्रेक्षकांमुळे आहे. तथापि, चित्रपटांचे सततचे सिक्वेल आणि त्यांचे नैसर्गिक समाप्ती या प्रश्नावर रितेश म्हणतो की थकवा प्रेक्षकांवर किंवा प्रेक्षकांच्या थकव्यावर अवलंबून असेल आणि हे भाग देखील दीर्घ कालावधीनंतर येत आहेत. ते पाच वर्षांनी किंवा दहा वर्षांनी येत आहेत. म्हणजे ते दर महिन्याला परत येत आहेत असे नाही. कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, रितेश देशमुख शेवटचा 'हाऊसफुल ५' या फ्रँचायझी चित्रपटात दिसला होता. याशिवाय, येत्या काळात तो 'मस्ती ४' आणि 'धमाल ४' या दोन फ्रँचायझी चित्रपटांमध्येही दिसणार आहे. याशिवाय, तो 'राजा शिवाजी' या मराठी चित्रपटातही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनही रितेश देशमुख स्वतः करत आहेत.



# दीपिका 'द इंटर्न'च्या हिंदी रिमेकमधून बाहेर



'रामायण' हॉलिवूडचा सुपरहिट 'द इंटर्न' ह्या सिनेमात रॉबर्ट डि नीरो आणि ॲनी हॅथवे यांनी मुख्य भूमिका साकारली होती. या सिनेमाचा हिंदीतही रिमेक येणार असल्याची चर्चा होती. यात अमिताभ बच्चन आणि दीपिका पादुकोण भूमिका साकारणार होते. मात्र आता या सिनेमातून दीपिकाने माघार घेतल्याची माहिती समोर आली आहे. दीपिका या हिंदी सिनेमात स्वतः भूमिका साकारणार होती. तर तिच्यासोबत ऋषी कपूर यांना घ्यायचं असा आधी विचार सुरु होता. मात्र ऋषी कपूर यांच्या निधनानंतर अमिताभ बच्चन यांचं नाव फायनल झालं. नंतर कोरोनामुळे हा प्रोजेक्टच लांबणीवर पडला.

दीपिकाने अभिनेत्री म्हणून आता द इंटर्न च्या हिंदी रिमेकमधून माघार घेतली आहे. पण ती सिनेमाच्या निर्मिती आणि लॉजिस्टिक गोष्टींवर लक्ष देणार आहे. दीपिका पादुकोण तिच्या घ- प्रोडक्शन अंतर्गत या सिनेमाची निर्मिती करणार आहे. मात्र ती सिनेमात काम करणार नसल्याने अनेक चाहते नाराज होण्याची शक्यता आहे. दीपिकाच्या कामाबद्दल बोलायचं झाले तर, पदार्पणाच्या पहिल्याच चित्रपटाने दीपिकाला लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर तिने 'चेन्नई एक्सप्रेस', 'हॅपी न्यू इयर', 'पठाण', 'जवान' अशा अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटातून प्रेक्षकांच्या मनात आपलं अढळस्थान निर्माण केले. आगामी काळात दीपिका 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटाच्या सीक्वेलचं काम सुरू करणार आहे. तसेच शाहरुखच्या किंग चित्रपटात देखील ती भूमिका साकारणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# मिथुन आणि रजनीकांत तीस वर्षांनंतर पुन्हा एकत्र!

भारतीय चित्रपटसृष्टीतील दोन दिग्गज कलाकार मिथुन चक्रवर्ती आणि रजनीकांत तब्बल ३० वर्षांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर दिसणार आहेत. ही बातमी समजताच चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

स्वतः मिथुन यांनी या गोष्टीचा खुलासा केला असून ते रजनीकांतसोबत 'जेलर २' या मोठ्या चित्रपटात काम करणार आहेत. १९८९ मध्ये प्रदर्शित झालेला हिंदी चित्रपट 'भ्रष्टाचार' मध्ये मिथुन आणि रजनीकांत एकत्र दिसले होते. त्यानंतर १९९५ साली आलेला बंगाली चित्रपट 'भाग्य देवता' मध्येही या जोडीने काम केले होते. विशेष म्हणजे 'भाग्य देवता' हा रजनीकांतचा एकमेव बंगाली चित्रपट होता, ज्यामध्ये त्यांनी स्पेशल अपीयरन्स दिले होते. या चित्रपटानंतर मात्र ही जोडी पुन्हा कधी एकत्र दिसली नाही. त्यामुळे तब्बल तीन दशकांनंतर हे दोन्ही सुपरस्टार्स एका चित्रपटात दिसणार आहेत.

मिथुन चक्रवर्ती यांनी सांगितले की काही दिवसांपूर्वी एका विशेष समारंभात त्यांची आणि रजनीकांत यांची भेट झाली. या भेटीदरम्यान रजनीकांत यांनी हसत-हसत म्हटले, आपण दोघांनी आता पुन्हा एकत्र काम करायला हवं. मिथुन यांनी लगेच होकार दिला आणि तिथेच या मोठ्या प्रकल्पाचा निर्णय घेण्यात आला. मिथुन यांनी हेही उघड केले की ते २५ ऑगस्टपासून 'जेलर २' च्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. फक्त रजनीकांत नव्हे तर मिथुन चक्रवर्ती लवकरच आणखी एका सुपरस्टारसोबत दिसणार आहेत. ते म्हणजे प्रभास! मिथुन यांनी सांगितले की, ते प्रभासच्या 'फौजी' या चित्रपटात महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. यामुळे त्यांच्या चाहत्यांना सलग दोन मोठे सरप्राईज मिळाले आहेत. सध्या मिथुन चक्रवर्ती त्यांच्या अपकमिंग चित्रपट 'द बंगाल फाइल्स' मुळे आधीच चर्चेत आहेत. या चित्रपटात त्यांनी एक वेगळं आणि आव्हानात्मक पात्र साकारलं आहे. दक्षिणेत रजनीकांतची लोकप्रियता देवासारखी आहे, तर हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीत मिथुन यांचा तितकाच मोठा चाहतावर्ग आहे. त्यामुळे हे दोन्ही दिग्गज ३० वर्षांनंतर पुन्हा एकत्र येणार ही बातमी चाहत्यांसाठी दुहेरी आनंदाची ठरली आहे. म्हणजेच, पुढील काही महिन्यांत प्रेक्षकांना 'जेलर २', 'फौजी' आणि 'द बंगाल फाइल्स' या चित्रपटांच्या माध्यमातून मिथुन चक्रवर्तींचा वेगळा अवतार पाहायला मिळणार आहे. चित्रपटसृष्टीसाठी आणि प्रेक्षकांसाठी हे खरंच एक मोठं रीयुनियन ठरणार आहे.